


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १४९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.१० जानेवारी २०२५

## कल्याण-डोंबिवलीत कचरा गाडीची भीषण धडक



**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.८, कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या कचरा गाडीने कल्याण पश्चिम लाल चौकी परिसरात दिलेल्या धडकेत लहान मुलगा आणि एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार, वाहनचालक नशेच्या अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. हा अपघात दि. ८ मंगळवारी रोजी दुपारच्या सुमारास घडला. पालिकेची कचरा उचलण्याची गाडी रस्त्यावरुन जात असताना ती अचानक रस्ता ओलांडत असलेल्या महिलेला आणि लहान मुलाला जोरात धडकली. धडकेने दोघेही जागीच गंभीर जखमी झाले त्याना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. महिलेचे नाव निशा सोमेसकर, व मुलाचे नाव अंश सोमेसकर असे होते. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी कचरा गाडीच्या ड्रायव्हरला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. प्राथमिक तपासात ड्रायव्हर नशेच्या अवस्थेत असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, याबाबत अधिकृत तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले,नागरिकानी प्रचंड संताप व्यक्त करत रस्ता रोजी केला. या दुर्दैवी घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली होती नागरिकांनी कचरा गाड्यांच्या व्यवस्थापनावर आणि वाहनचालकांच्या वर्तनावर प्रश्न उपस्थित केले आहेत. पालिका प्रशासनाने वाहनचालकांच्या प्रशिक्षण व आरोग्य तपासणीवर अधिक लक्ष देण्याची मागणी होत आहे.

## अष्टविनायक महामार्गावर कवठे येमाईत पुन्हा भीषण अपघात

### तरुण जागेवरच ठार



**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.८, कवठे येमाई (शिरूर) :** शिरूरच्या पश्चिम भागातून जाणारा अष्टविनायक महामार्ग गतिमान झाल्याने मृत्यूचा सापळा बनताना दिसून येतोय. काही दिवसांपूर्वीच कवठे येमाईच्या इचकेवाडी जवळ झालेल्या अपघात दोन ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना ताजी असतानाच काल मंगळवार दि. ०७ ला रात्री आठच्या दरम्यान दुचाकी व चारचाकीच्या झालेल्या भीषण अपघातात एक तरुण ठार झाल्याची घटना घडली आहे.त्यामुळे रस्त्याने वाहने त्यातल्या त्यात दुचाकी चालवताना योग्य त्या सुरक्षा कवचासह चालकांनी खूपच सावधानता घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

या अपघाताबाबत टाकळी हाजी पोलीस दूरक्षेत्राचे पोलीस हवालदार शरद वारे यांच्या कडून मिळालेल्या माहिती नुसार पिंपरखेड ता.शिरूर येथील २५ वर्षीय तरुण आदिनाथ गोपाळ जाधव रा.पिंपरखेड ता.शिरूर हा रांजणगाव गणपती येथील मेडिकल दुकान बंद करून दुचाकीवरून आपली दुचाकी गाडी नंबर एम एच १२ एक्स जे ४३०७ यावर पिंपरखेड येथे चाललेला असताना रात्री आठच्या दरम्यान अष्टविनायक महामार्गावर कवठे येमाई येथील हिलाळ (फासे वस्ती) नजीक याच रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या झालेल्या धडकेत जागेवरच ठार झाला आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून या गतिमान झालेल्या महामार्गावर धोकेदायक ठरणाऱ्या ठिकाणी तात्काळ गतिरोधक बसविण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थ व प्रवाशांतून व्यक्त होत आहे.या अपघाताचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अनिल आगलावे हे करीत आहेत.

## खडकपाडा पोलिसांनी मोहने रोड परिसरात

## ११२३ ग्रॅम गांजा जप्त; आरोपीला अटक



**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.९, कल्याण (ठाणे) :** खडकपाडा पोलिसांनी मोहने रोड, बंदरपाडा येथील कृष्णा किराणा स्टोअरजवळ छापा टाकून ११२३ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. अंमली पदार्थांच्या तस्करीप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

मा. पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे, परिमंडळ ३ कल्याण यांच्या मार्गदर्शनाखाली बाजारपेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एल. डी. साबळे आणि डोंबिवली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.खडकपाडा पोलिसांना मोहने रोड बंदरपाडा परिसरात गांजाची विक्री होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने तातडीने छापा टाकण्यात आला. छाप्यात आरोपी लक्ष्मण बाबू रेड्डी (वय ४०) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून विक्रीसाठी ठेवलेल्या ११२३ ग्रॅम गांजासह इतर पुरावे जप्त करण्यात आले आहेत.सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध छूझड कायदा कलम ८ आणि २० (इ) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी नागरिकांना अंमली पदार्थांविरुद्ध सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, अशा बेकायदेशीर विक्रीबाबत तातडीने माहिती देण्याचे सांगितले आहे.पोलीस विभागाच्या या यशस्वी कारवाईबद्दल स्थानिक नागरिकांनी प्रशंसा केली असून, अंमली पदार्थांचा प्रसार रोखण्यासाठी अशा कडक कारवायांची गरज असल्याचे मत व्यक्त केले आहे.

# हा खरंच टक्कल व्हायरस की आणखी काय ??



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, बुलडाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यात सहा गावात जवळपास ५० पेक्षा अधिक व्यक्तींना अचानक केसगळतीचा त्रास होऊ लागला. अगदी काही दिवसातच त्यांचे टक्कल पडत आल्याने सगळीकडे याचीच चर्चा सुरू झाली. एकाचवेळी अनेकांना हा त्रास होऊ लागल्याने परिसरात भीतीचे वातावरण पाहायला मिळाले. दरम्यान आज या संपूर्ण प्रकरणाबद्दल आणि केसगळतीच्या संभाव्य कारणांबद्दल जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर अमोल गीते यांनी माहिती दिली आहे.

**केसगळतीचे कारण काय?**

काल आमच्या निदर्शनास आले की पाच ते सहा गावांमध्ये केसगळतीच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. आम्ही तपासणी केली. त्वचा रोगांचे तज्ज्ञ आमच्याबरोबर होते. त्यांचं क्लिनीकल डायग्नोसीस असं आहे की, त्यांना (रुग्णांना) डोक्याच्या त्वचेचे फंगल इन्फेक्शन झाले आहे. आम्ही त्या त्वचेचे नमूनेही घेतले आहेत आणि ते अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात त्याची हिस्टोपॅथॉलॉजी तपासणी करण्यासाठी पाठवले आहेत. त्यामधून निष्कर्ष नक्कीच निघेल. पण सध्या क्लिनीकल निष्कर्षहा आहे की हे फंगल इन्फेक्शन आहे आणि त्यानुसार आपण रुग्णांवर उपचारही सुरू केले आहेत.

**दूषित पाण्यामुळे केस गळत आहेत का?**

गावामधील पाणी दूषित झाल्याने नागरिकांना केस गळतीचा त्रास होत असल्याची शंका व्यक्त केली जात आहे, याबद्दल विचारले असता गिते म्हणाले की, दूषित पाणी असतं तर संपूर्ण गावाला हा त्रास झाला असता. संपूर्ण गावाला हा त्रास नाही. पाण्याचा नक्की काहीतरी परिणाम असेल. पण पाण्यामुळे इन्फेक्शन वाढतंय असं म्हणणं योग्य ठरणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

पाण्याचे नमुने देखील तपासणीसाठी पाठवले आहेत, त्यामधून काय समोर येतं यावर देखील पुढील कारवाई काय असेल हे ठरेल, असेही डॉक्टर अमोल गीते म्हणाले.

फंगल इन्फेक्शन ठराविक भागातच का होत आहे, याचा तपास आपण करत आहोत. कालपर्यंत ५१ रुग्ण होते. रुग्णांची संख्या कमी होत असून ती वाढत नाही असेही त्यांनी सांगितले. ज्या लोकांचे केस गेले होते ते पण परत उगवण्यास सुरूवात झाले असून नागरिकांनी घाबरून जाण्याची गरज नाही असेही गीते यावेळी म्हणाले आहेत.

दरम्यान केसगळतीचे नेमके कारण काय हे शोधण्यासाठी गावातील पाण्याचे नमुने संकलित करून अहवालासाठी पाठवण्यात आले होते. आज या तपासणीचा अहवाल प्राप्त झाला या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर अमोल गीते यांनी माहिती दिली. गीतेंनी सांगितलं की, प्राथमिक तपासणी केल्यानंतर बाधित गाव परिसरातील पट्टा हा खारपणपट्ट्यात येतो तेथे पाण्यातील नायत्रेटचं प्रमाण जास्त आहे. साधारणतः पाण्यामध्ये नायट्रेटचे प्रमाण १० टक्के असायला पाहिजे मात्र या गावांमध्ये ते ५४ टक्के आहे. त्यामुळे या भागातील पाणीच घातकच असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय आरसेनिक व लीड तपासणीसाठी पुणे प्रयोगशाळेत पाणी नमुने पाठवल्याची माहिती ही त्यांनी यावेळी दिली आहे.

## 'एचएमपीव्ही' विषाणूबाबत नागरिकांनी घाबरून जाऊ नये- जिल्हाधिकारी डुडी

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि,९, पुणे :** 'एचएमपीव्ही' हा विषाणू नवीन नाही. त्याबाबत नागरिकांनी घाबरून जाऊ नये. तथापि, सतर्कता बाळगावी, काळजी घ्यावी तसेच आरोग्य विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेन्द्र डुडी यांनी केले आहे.




जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी 'एचएमपीव्ही' विषाणूच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी (दि. ८) आढावा घेतला. बैठकीस ससून सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय बारामतीचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत म्हस्के, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यम्पल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई, तसेच सर्व उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांचे आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

'एचएमपीव्ही' विषाणूच्या अनुषंगाने आरोग्य यंत्रणांनी सज्ज रहावे असे निर्देश देऊन जिल्हाधिकारी श्री. डुडी म्हणाले, हा विषाणू २००१ पासून माहितीमध्ये आहे. तथापि, वैद्यकीय यंत्रणांनी सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना या विषाणूबाबत कसे उपचार करता येतील यासाठी अवगत ( ओरीएंटेशन ) करावे. सर्व आरोग्य संस्थेमध्ये किमान पुढील तीन महिने पुरेल इतका पुरेशा प्रमाणात औषधसाठा उपलब्ध ठेवावा. व्हेन्टींलेटर्स, ऑक्सिजन प्लँट तसेच अन्य साधनसामुग्री सुस्थितीत असल्याबाबत खात्री करावी. आवश्यक तेथे त्वरीत दुरुस्ती करुन घ्यावी. दैनंदिन आएलआय/सारी (एसएआरआय) सर्वेक्षण गुणवत्तापूर्ण व नियमित सुरु ठेवावे. दैनंदिन गृहभेटी मध्ये जनजागुती करावी. आवश्यकतेनुसार साबण व पाणी यांचा वापर करावा. सॅनेटायझरचा वापर करावा.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. यम्पल्ले यांनी आरोग्य विभागाच्या तयारीबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच पुणे जिल्ह्यात यंत्रणा दक्ष असल्याचे सांगितले.

## आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी पत्नी व प्रियकर गजाआड

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.९, राहुरी (अहिल्यानगर) :** आत्महत्येस प्रवृत्त करून पसार झालेल्या पत्नी व तिच्या प्रियकराच्या पोलीस पथकाने मुसक्या आवळून गजाआड केले. पत्नीला पतीचा दशक्रियाविधी होताच ताब्यात घेतले तर प्रियकराला राहुरी तालुक्यातील ताहराबाद परिसरातून ताब्यात घेतले आहे.



राहुरी तालुक्यातील ताहराबाद येथील एका विविहित तरुणाने शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास राहत्या घरात दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली होती.

मात्र त्याने गळफास घेण्यापूर्वी सर्व घटना एका चिठ्ठीत लिहून ठेवली तसेच त्याच्या मोबाईलवर रेकॉर्ड करून ठेवले. मयत तरुणाच्या पत्नीचे शेजारीच राहणार्या रवी एकनाथ गांगड या तरुणाशी संबंध होते. आरोपींनी अनेक वेळा मयताला दमदाटी करुन मारहाण केली होती. आरोपींच्या त्रासाला कंटाळून या तरुणाने अखेर गळफास घेऊन आत्महत्या केली. तसेच आरोपींना अटक झाली पाहिजे. असा मजकूर त्याच्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड केलेला आढळून आला आहे. नातेवाईकांनी राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून मयताची पत्नी तसेच तिचा प्रियकर रवी एकनाथ गांगड, सचिन एकनाथ गांगड, रा. ताहराबाद, ता. राहुरी, या तिघांवर भारतीय न्याय संहिता कलम १०८, ११५ (२), ३५१ (२), ३५१ (३), ३ (५) प्रमाणे आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक समाधान फडोळ, पोलीस नाईक रवींद्र कांबळे, रामनाथ सानप, अविनाश दुधाडे आदी पोलीस पथकाने ताहराबाद परिसरात आरोपींचा शोध घेतला.

यावेळी आरोपी सचिन एकनाथ गांगड याच्या मुसक्या आवळून ताब्यात घेतले. मात्र मुख्य आरोपी रविंद्र गांगड व मयताची पत्नी हे दोघे पसार झाले होते. पथकाने आरोपी रविंद्र एकनाथ गांगड याच्या ५ जानेवारी रोजी मुसक्या आवळून ताब्यात घेतले. तर मयत रमेश उर्फ रामा गांगड याच्या दशक्रिया विधीच्या कार्यक्रमा ठिकाणी त्याची पत्नीला दशक्रिया विधीचा कार्यक्रम होताच ताब्यात घेऊन गजाआड केले पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक समाधान फडोळ करीत आहेत.

## सासरच्यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या

**दि.९, ठाणे :** सासरच्यांच्या त्रासाला कंटाळून २० वर्षीय महिलेने आत्महत्या केल्याचा प्रकार गुरुवारी भिवंडीतील फतामानगर परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी आत्महत्या केलेल्या महिलेच्या वडिलांनी तिच्या सारच्यांविरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीच्या आधारे पोलीसांनी तिच्या नवरा, सासु आणि नणंदेच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. भिवंडीतील गायत्रीनगर परिसरात लग्नापूर्वी ही महिला आपल्या आई-वडिलांसह राहत होती. ऑक्टोबर २०२४ मध्ये तिचा विवाह फतामानगर परिसरात राहणाऱ्या एका तरुणासोबत झाला. या दोघांचाही हा दुसरा विवाह होता. परंतू, लग्नानंतर सासरच्यांकडून होत असलेल्या त्रासामुळे महिला महिनाभर माहेरीच राहत होती, असा आरोप तिच्या घरच्यांनी केला आहे. महिनाभरानंतर ती सासरी परत गेल्यानंतर नवरा, सासू आणि नणंदेकडून वारंवार मानसिक आणि शारिरिक त्रास दिला जात होता. या त्रासाला कंटाळून महिलेने आत्महत्या केली.

अक्षराज

२ बुलडाणा, शुक्रवार, दि.१० जानेवारी २०२५ विविधा

# संपादकीय



## येसुदास

आज १० जानेवारी हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायक आणि संगीतकार येसुदास यांची ८५ वाढदिवस. हिंदी चित्रपट सृष्टीत ज्या गायकांनी आपल्या मधुर आवाजाने ठसा उमटवला त्यात येसुदास हे एक महत्वाचे नाव. १० जानेवारी १९४० रोजी एका मल्याळम ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या येसुदास यांचे वडील मल्याळम भाषेतील शास्त्रीय संगीतकार होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी संगीतकलेचे प्राथमिक धडे गिरवले. वयाच्या सातव्या वर्षी कोची येथील स्थानिक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदक जिंकले. कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तामिळ या दक्षिण भारतातील सर्व भाषेत त्यांनी गाणी गायली तिथे त्यांनी गायलेली सर्वच गाणी हिट झाली. त्यांच्या आवाजाची परदेशातील रसिकांना देखील भुरळ पडली. १९६५ साली रशियन सरकारने त्यांना गाण्यासाठी खास आमंत्रण दिले होते. गोड, मखमली आवाज ही येसुदास यांची ओळख बनली. त्यांच्या गोड आणि मखमली आवाजाची कीर्ती हिंदी चित्रपट सृष्टी पर्यंत पोहचली नसती तरच नवल. संगीतकार सलील चौधरी यांनी त्यांना दिग्दर्शक बासू चॅटर्जी यांच्या छोटीशी बात या चित्रपटात साठी एक गाणे गायला लावले. त्यांच्या आवाजाने बासू चॅटर्जी हे ही प्रभावित झाले त्यांनी त्यांना त्यांच्यव चित्रपटात गाण्याची ऑफर दिली. १९७० सालापासून त्यांनी हिंदी गाणी गायला सुरवात केली. जानेमन जानेमन तेरे दो नयन.... या गाण्यानंतर शांत सज्जन दिसणारा अमोल पालेकर यांच्यासाठी येसुदास यांचाच आवाज सूट होतो असा असे गणित बॉलिवूडने बांधले. येसुदास यांच्या मधुर आवाजामुळे अनेक संगीतकार त्यांना त्यांच्यासाठी गाण्याची गळ घालू लागले मात्र येसुदास हे गाण्याची निवड मात्र विचारपूर्वक करत. येसुदास यांनी फक्त अमोल पालेकर यांच्यासाठीच नाही तर अमिताभ बच्चन आणि जितेंद्र यांच्यासाठीही गाणी गायली. त्यांनी रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, खय्याम, राजकमल, सलील चौधरी या संगीतकारांसमवेत अनेक सदाबहार हिंदी चित्रपटातील गाणी गायली. त्यांनी जवळपास ४५००० गाणी गायली आहेत. सध्याच्या पद्धतीची गाणी त्यांना आवडत नाहीत म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षांपासून गाणे गायचे थांबवले आहे. येसुदास यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. भारत सरकारने त्यांना २००२ सालीं पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार दिला आहे तर केरळ सरकारने त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम स्वाती पुरस्कारम या पुरस्काराने गौरविले आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत. येसुदास यांनी काही दाक्षिणात्य भाषेतील चित्रपटांची निर्मितीही केली आहे. येसुदास यांनी गायलेली गोरी तेरा गाव बडा प्यारा, सुरमई अखियों मे, दिल के तुकडे तुकडे करके, जानेमन जानेमन तेरे दो नयन, चांद जैसे मुखडे पे ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. येसुदास यांचे चाहते केवळ भारतातच आहेत असे नव्हे जगभर त्यांचे चाहते आहेत. गोड आणि मखमली आवाजाचे गायक येसुदास यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# राज्यात मराठी भाषेचे महत्व वाढणार केव्हा ?

अथक प्रयत्नांनंतर मराठी भाषेला गतवर्षी अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. राज्यातील प्रत्येक शाळा मग ती खासगी असो, केंद्रीय असो वा अन्य भाषिक त्यामध्ये मराठी शिकवणे अनिवार्य अरण्यात आले आहे. असे असताना काही शाळांमध्ये मराठी भाषा शिकवण्यास टाळाटाळ केली जात असल्याच्या तक्रारी राज्याच्या शिक्षण विभागाकडे आल्यावर शिक्षण मंत्र्यांनी याप्रकरणी लक्ष घालून मराठी भाषा शिकवण्यास टाळणाऱ्या शाळांवर शिक्षण विभागाची नजर असणार असल्याचे विधान केले आहे. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून शिक्षण विभागाचा रोडमॅप तयार करण्यात आला असून पुढील काही दिवसांत शिक्षण विभाग तो जाहीर करणार आहे. राज्यात शालेय शिक्षणात मराठीची सक्ती योग्यच असून येणाऱ्या मराठी भाषेची किमान ओळख होण्यास त्यामुळे साहाय्य होणार आहे. राज्यात मराठी भाषा रुजवण्याचे, भाषेची आवड निर्माण करण्याचे कार्य ज्याप्रकारे शिक्षण विभाग करत आहे, त्याप्रमाणे शिक्षण क्षेत्रात इंग्रजी भाषेचे वाढलेले अवास्तव स्तोम कमी करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

आज मराठी भाषेला महाराष्ट्रातच घरघर लागली आहे याचे कारण आपलाच व्यवहारातील मराठीचा वापर कमी होत चालला आहे. एकीकडे मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत, तर दुसरीकडे इंग्रजी माध्यमांच्या आणि कॉन्व्हेंट शाळांना अच्छे दिन आले आहेत. पाल्यांवर लहानपणापासून इंग्रजीची सक्ती करून आपण केवळ मराठीला डावलतो आहोत असे नव्हे, तर पाल्यांचा बौद्धिक विकासही खुंटत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ? जेव्हा व्यवहाराची आणि शिक्षणाची भाषा एक असते तेव्हाच त्या भाषेचे वैभव आणि त्यातील शब्दसंपदा, खऱ्या अर्थाने आपल्या लक्षात येऊन ती भाषा आपल्या भाव भावना व्यक्त करण्याचे, संवेदना जाणून घेण्याचे, विचार व्यक्त करण्याचे साधन बनते. आजमितीला चारचौघांत इंग्रजी भाषेत संभाषण साधने प्रतिष्ठेचे समजले जाते. प्रतिष्ठेची ही व्याख्या आपणच तयार केली आहे ना ? आपल्याला फारसे इंग्रजी येत नाही म्हणून महाराष्ट्रात मराठी माणूस न्यूनगंड बाळगू लागला आहे. इंग्रजी भाषेत अस्खलित बोलण्यास शिकवणाऱ्या शिकवण्या जागोजागी तयार होऊ लागल्या आहेत त्यामध्ये मोठ्या




संख्येने मराठी तरुणच दिसून येतात. ही गरज कोणी निर्माण केली ? शाळांमध्ये मुलांना भरती करण्याआधी त्यांच्या पालकांना इंग्रजी येते का हे पाहण्यासाठी प्रथम पालकांच्या मुलाखती घेतल्या जातात. अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये नव्याने नोकरीस लागणाऱ्या मराठी माणसाला आज इंग्रजी मुलाखतीला सामोरे जावे लागते. साधे सिम कार्ड घ्यायचे झाले, तरी त्याचा अर्ज इंग्रजीत भरावा लागतो. महाराष्ट्रात कुठल्याही क्षेत्रात आणि कोणत्याही संदर्भात निवेदन द्यायचे असेल किंवा अर्ज भरायचे असतील, तर त्यासाठी प्रथम पर्याय मराठीचाच असायला हवा ही सक्ती महाराष्ट्रात का केली जात नाही. आज मॉल किंवा सुपर मार्केट या ठिकाणी ग्राहकांशी नीट संवाद साधता यावा यासाठी हिंदी आणि इंग्रजी चांगले येणाऱ्या तरुण तरुणींना नोकरीवर ठेवले जाते त्यासाठी त्यांना अधिक वेतन दिले जाते त्यामुळे अशा ठिकाणी मराठी मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. ही स्थिती कोणी निर्माण केली ? महाराष्ट्रात राहायचे तर मराठी यायलाच पाहिजे. नीट बोलता नाही आले, तरी मराठी सम जायला तर हवेच. फळविक्रेत्याला मराठीत संवाद साधण्याचा आग्रह धरणाऱ्या एका मराठी तरुणाला मुंब्र्यात मारहाण केली जाते, माफी मागण्यास भाग पाडले जाते, त्याचा व्हिडीओ बनवून समजमाध्यमावर व्हायरल केला जातो, एव्हढे होऊनही सरकार जागे होत नाही. मराठी संघटना याविरोधात आवाज उठवत नाहीत. नेहमीप्रमाणे यामध्ये मनसे हस्तक्षेप करून म जोर विक्रेत्याविरोधात गुन्हा दाखल करण्यास पोलिसांना भाग पाडते. सोसायटीमधील मराठी रहिवाशांना अन्य अमराठी भाषिकांकडून घरात घुसून शिवीगाळ आणि मारहाण केली जाते तरी मारहाण करणाऱ्याच्या विरोधात तत्परतेने गुन्हा दाखल केला जात नाही महाराष्ट्रात मराठी भाषिकांवर अशीच दडपशाही होत असेल, माराठी भाषेची अशीच अवहेलना केली जात असेल तर मराठी माणसांनी न्याय तरी कोणाकडे मागायचा? आपल्या भाषेविषयी आपले प्रेम लोप पावत चालल्याचे हें परिणाम आहेत. आपल्या म ातृभाषेला आलेल्या या अवकळेला आपण मराठी भाषिकच कारणीभूत आहोत. आपल्या मातृभाषेविषयी आपली अशीच उदासीनता राहिली, तर पुढच्या पिढीवर मातृभाषेचे संस्कार तरी कसे होतील ? आज मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत. घरोघरी आई, बाबा, काका, मामा या गोड नात्यांची जागा आता मम्मा, डॅडा, आंटी, अंकलने घेतली आहे. मुलांना असे म्हणण्यास पालकांकडूनच प्रवृत्त केले जात आहे. मराठी सणांचे महत्व कमी होऊन फेब्रुवारीतील 'डेज' उत्साहाने साजरे होऊ लागले आहेत, नाताळात घरोघरी ख्रिसमस ट्री येऊ लागले आहेत, मराठी घरात नववर्ष गुढीपाड्व्यापेक्षा एक जानेवारीला अधिक उत्साहाने साजरे होऊ लागले आहे. घरोघरी वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार तिथींना नव्हे तर इंग्रजी तारखांना साजरे होऊ लागले आहेत. मराठी भाषेला जपायचे असले तर सर्वप्रथम मराठी संस्कृती आणि मराठी अस्मिता जपणे अधिक महत्वाचे आहे आणि त्याची सुरुवात प्रत्येक मराठी माणसाने स्वतःपासून आणि आपल्या कुटुंबापासून करायला हवी. मराठी भाषेला अभिजात दर्जा तर मिळाला मात्र त्यानंतर राज्यात मराठी भाषा वाढवण्याचे आणि समृद्ध करण्याचे, मराठी रक्षणाचे जे प्रयत्न व्हायला हवेत ते मात्र अद्यापही दिसून येत नाहीत.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# पालिकेच्या कर्मचारीवृंदाचे बहारदार सांस्कृतिक सादरीकरण

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.०८, वाशी (नवी मुंबई) :**

महानगरपालिकेच्या ३३ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून अधिकारी, कर्मचारी यांच्या अंगभूत कला, क्रीडागुणांना वाव देण्यासाठी विविध खेळांचे स्पर्धात्मक उपक्रम यशस्वी रितीने राबविल्यानंतर आज वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात गीत, नृत्य, नाट्य आदी सांस्कृतिक सादरीकरण उत्साहात संपन्न झाले.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी याप्रसंगी उपस्थित राहून सादरीकरण करणाऱ्या कलावंताचे भरभरून कौतुक केले. कार्यालयात प्रशासकीय



कामकाज करताना अशाप्रकारे कलागुणांची जोपासना करून आपण संस्कृती जपण्याचे कामही करीत आहात हे अभिनंदनीय असल्याचे सांगत आयुक्तांनी मराठी भाषेला केंद्र व राज्य शासनाम ुळे अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला असून ही भाषा संस्कृती वाढविण्याचे काम आपण करूया असे सांगितले. महानगरपालिकेचे काम जनतेपर्यंत पोहचविण्याचे मोठे काम प्रसारमाध्यमांमुळे होते याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. यापुढील काळात अधिक ऊर्जेने आपण काम करूया आणि नागरिकांना तक्रार करण्याची संधी मिळणार नाही अशाप्रकारे गुणात्मक सेवासुविधा पुरविण्यासाठी कटिबध्द राहूया असे आवाहन त्यांनी केले.

अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी शेरोशायरीची बरसात करीत जिंदादीलपणे सादर केलेल्या २ बहारदार गाण्यांनी कार्यक्रमाची उंची वाढविली. समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, शिक्षणाधिकारी अरूणा यादव या अधिकाऱ्यांनीही टाळ्यांची दाद घेत कलात्मक सादरीकरण केले.

या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये २५ वैयक्तिक गायन, ५ समुह गायन, १० वैयक्तिक नृत्ये, ९ समुह नृत्ये व ३ नाटिका अशाप्रकारे अप्रतिम कलाविष्कार अधिकारी – कर्मचारीवृंदाने जल्लोषात सादर केले. यावेळी महानगर पालिकेचे विभागप्रम ुख व अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विनोद गोरे वाढदिवसाच्या**
**मंगलमय शुभेच्छा...**

जिवनाच्या वाटेवर
किती काटे किती फुले
त्यातूनही मार्गक्रम
सुखी जगण्यांचे झुले

अक्षराज दैनिकाचे
संपादन मुक्तपणे
कोणत्याही दबावाच्या
प्रभावात नच येणे

मित्रा निर्भिड लिहिणे
सत्य काय ते मांडणे
समाजोपयोगी कर्म
आपोआप रे घडणे

वाढदिवसाच्या तुला
खूप खूप आशिर्वाद
शत शतकोत्तर हा
घडो सदाची संवाद

असो मिश्किल विनोद
जिवनाच्या अंतरंगी
आनंदाची पर्वणीच
यावी रे रंगीबेरंगी

**- अशोक बी.कांबळे, नागपूर**
**८६०००३३२०८**

**ना पास..**

नो डिटेंशन पॉलिसी
रद्द करणारं आता
नापासा ढकल पास
नको करायला वृथा

आता तपासली जाई
मुलाची खरी क्षमता
फाजीललाड कशास
काय कामाची ममता

छात्र होतील चलाख
अभ्यासा पुन्हा रमता
झोपहीलागेल निवांत
श्रमाने चांगले दमता

समस्त विद्यार्थ्यांमध्ये
हवी समानता समता
नवा निर्णय लाभदाई
संपवूनटाके विषमता

निर्माण करावीचुरस
गणितनव्याने जमता
सरावा सातत्यजरूर
आपसूक ये विनम्रता

दिशा दर्शन पालकां
नको मना संभ्रमता
निर्णयांत हो स्पष्टता
दूरगामी परिणामता

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# जव्हार तालुक्यातील अजूनही पंधराहून अधिक गावे नॉट रीचेबल

**अक्षराज : प्रमोद मौळे**
**दि.८, जव्हार (पालघर) :** एकीकडे जग हे डिजिटल युग होत चालले आहे. परंतु पालघर जिल्यातील अतिदुर्गम असलेला जव्हार तालुक्यातील अजूनही काही गावे नॉटरीचेबल मध्येच आहेत. जव्हार तालुक्यातील भौगोलिक परिस्थिती ही डोंगरदऱ्याच्या उतार असं स्वरूपाची आहे.

त्यामुळे या भागात पायाभूत सुविधा व सोने शासन प्रशासनाला अतिशय जोखम ीचे ठरत आहे असे असले तरी या भागात उपाययोजनाबाबत म्हणून करोडो रुपये खर्च झाले आहेत. परंतु परिस्थिती जैसे थे आहे वास्तविक पाहता डिजिटल इंडिया चे दुनियेत तालुक्यातील अनेक गावात म ोबाईल कव्हरेज असणे अत्यावश्यक होते. परंतु तालुक्यातील १५ गावे आणि बावीस हजार ४१० नागरिक हे अद्यापही विना कव्हरेज असल्याने हे गावी संपर्क पासून दूर राहिले आहेत.

सद्यस्थितीत एकीकडे जग दूरसंच क्षेत्रात प्रगती करत असताना तुझी थ्रीजी फोरजी आता पाहिजे वेगळी इंटरनेट घातला आहे पण दुसरीकडे वावर, वांगणी, बेहेडगाव, दाभेरी, डाहुळ, कायरी, रूईघर, बोपदरी,ओझर, किरमिरा, दाभलोन, वनवासी, खर्डी खरपडपाडा, या गावांना मोबाईलवरून संवाद साधण्याची ही होत नसल्याने नागरिकांना अनेक समस्यांना साम ना करावा लागत आहे. तसेच या भागात शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, रोजगार सेवक, यांना ऑनलाईन कामे करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे या भागाकडे प्रशासनाने अत्यंत लक्ष देण्याचे नागरिकांकडून मागणी होत आहे.



जव्हार तालुक्यातील अतिदुर्गम भाग गुजरात आणि दादर नगर हवेली बॉर्डर वर असलेले रुईघर बोपदरी लागून वावर वांगणी गावात आजची साधं मोबाईल वर संवाद साधण्याची सोय नाही. काही कामानिमित्त संवाद साधण्यासाठी आम्ही २,३ किलोमिटर वर जावून संवाद साधत असतो.
**- भगवान जाबर (बोपदरी ग्रामस्थ)**

आज जव्हार मध्ये कित्येक मंत्री येवून गेले परंतु त्यांनी ग्रामीण भागातील गावांना भेट द्यावी जेणेकरून ग्रामीण भागात काय सत्य परस्थिती आहे ते कळेल आणि समस्या सोडवतील.
**- किरण चौधरी (देहेरे ग्रामस्थ)**

वावर वांगणी किंवा रुईघर बोपदरी या भागातील अंगणवाडी सेविकांची किंवा इतरांशी संवाद साधायचे असेल तर डिजिटल युगात ही इंगजाच्या पूर्वी सारखी पद्धत आजची वापरावी लागते गावातल्या दुसऱ्या नागरिकांकडे तोंडी निरोप द्यावा लागतो ही शोकातींका आहे.
**- तारा भोये (अंगणवाडी युनियन अध्यक्ष)**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# राज्यस्तरीय सावित्री ज्योती गौरव पुरस्कार जाहीर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, अहिल्यानगर :** जय युवा अकॅडमी व जय असोसिएशन ऑफ एनजीओ महाराष्ट्र राज्याच्या वतीने दरवर्षी होणाऱ्या सावित्री ज्योती महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय सावित्री ज्योती गौरव पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आले असून सामाजिक, न्याय, पत्रकारिता, औद्योगिक, महिला सक्षमीकरण आदी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणारे वसंत रांधवण,सागर ससाणे, ॲड. शारदा लगड, गणेश बनकर, ॲड सुमेध डोंगरे यांचा सावित्री ज्योती गौरव पुरस्काराने सन्मान होणार असल्याचे निवड समितीच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

अहमदनगर शहरातील सावेडी रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात सावित्री ज्योती महोत्सवात दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी पद्मश्री पोपटराव पवार व खासदार निलेश लंके प्रमुख मान्यवरांच्या हस्ते हे पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष किशोर डागवाले, संस्थेचे अध्यक्ष तथा मुख्य संयोजक ॲड. महेश शिंदे व पुरस्कार



सागर ससाणे | ॲड. शारदा लगड | ॲड. सुमेध डोंगरे | गणेश बनकर | वसंत रांधवन

निवड समितीचे प्रमुख मान्यवरांनी दिली. वसंतराव रांधवण पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल रहिवासी असून ते दैनिक अक्षराज मिडियाचे जिल्हा प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे तालुका उपाध्यक्ष म्हणून ते काम पाहत आहेत.

मागील १६ वर्षापासून सामाजिक कार्यक्रमात सातत्याने उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना अनेक विविध पुरस्कार मिळाले आहेत. सागर ससाणे हे नामांकित एल अँड टी इलेक्ट्रीकल ॲड ॲटोमेशन व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. उच्चविद्याविभूषित राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत व परिषदांमध्ये अनेक सुवर्णपदक प्राप्त केलेले आहे. औद्योगिक क्षेत्राचा १९ वर्षाचा अनुभव असून अभियांत्रिकी महोत्सवात व्याख्यान दिलेले आहे. ॲड. शारदा लगड या ३२ वर्षापासून वकिली क्षेत्रात कार्यरत आहेत. त्या सध्या अंबिका महिला सहकारी बँकेच्या चेअरमन असून गेल्या ३० वर्षापासून महिलांच्या विविध प्रश्नांवर कार्यरत आहे. त्यांना योग्य विद्या धामचा योग साधने बद्दल महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार देखील मिळालेला आहे.

तसेच स्फूर्ती महिला आदर केंद्राच्या त्या संस्थापक अध्यक्ष असून राजकीय क्षेत्रातही त्यांनी अनेक महत्त्वाची पदे भूषविली आहेत. ॲड सुमेध डोंगरे हे शिरूर (जि. पुणे) येथिल विधीज्ञ असून त्यांनी पीएचडी प्राप्त केलेली आहे. मुंबई उच्च न्यायालयात वकिली व्यवसाय करतात. समाजभूषण सुलोचनाबाई डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. गणेश बनकर हे नगर तालुक्यातील कामरगावचे भूमिपुत्र असून भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून काम पाहत आहे. ते संत सावता क्रांती परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष व क्रांतीज्योती बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. सर्व जातीय वधू - वर मेळावे वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, ग्रामविकासाच्या योजना, शासकीय योजनांचा प्रचार प्रसार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचून त्यांचा लाभ मिळवून देत आहेत.सामाजिक राजकीय धार्मिक कार्यात गेल्या १५ वर्षापासून ते योगदान देत आहेत.

सावित्री ज्योती महोत्सवाच्या पुरस्कार निवड समितीने पुरस्कारर्थींच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय सावित्री ज्योती गौरव पुरस्कार जाहीर केला आहे. पुरस्कार निवड समितीमध्ये प्रा. सुनील मतकर, भीमराव उल्हारे, शिवाजी नवले, आरती शिंदे, रावसाहेब काळे, विनोद साळवे, निलेश रासकर, रावसाहेब मगर यांनी काम पाहिले.

# थोडक्यात

## 'दै.अक्षराज' चे पत्रकार वसंत रांधवण यांना राज्यस्तरीय सावित्री ज्योती गौरव पुरस्कार जाहीर



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील रहिवासी पारनेरचे भूमिपुत्र व दैनिक अक्षराज चे अहमदनगर जिल्हा प्रतिनिधी तसेच अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष वसंत रांधवण यांना जय युवा अकॅडमी व जय असोसिएशन ऑफ एनजीओ महाराष्ट्र राज्याच्या वतीने दरवर्षी होणाऱ्या सावित्री ज्योती महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय सावित्री ज्योती गौरव पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला असून, सावित्री ज्योती महोत्सव पुरस्कार निवड समितीचे प्रमुख मान्यवरांनी वसंत भानुदास रांधवण यांना निवडीचे पत्र देऊन कळविले आहे.

रविवार, दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी अहमदनगर शहरातील सावेडी रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी पद्मश्री पोपटराव पवार, खासदार निलेश लंके, समाजकार्य महाविद्यालयाचे डॉ.सुरेश पठारे, पुणे येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. प्रशांत साळुंके,सुहासराव सोनवणे, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, स्वागताध्यक्ष किशोर डागवाले या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय सावित्री ज्योती गौरव पुरस्कार २०२५ देऊन वसंत रांधवण यांना सन्मानित करण्यात येणार आहे. पत्रकारिता क्षेत्रात गेल्या काही वर्षांतील सातत्यपूर्ण कामगिरी व १६ वर्षापासून सातत्याने सामाजिक कार्य केल्याबद्दल आम्ही सावित्री ज्योती महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वसंत रांधवण यांना राज्यस्तरीय सावित्री ज्योती गौरव पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला असल्याचे मुख्य संयोजक ॲड.महेश शिंदे,प्रा. सुनील मतकर, भीमराव उल्हारे, शिवाजी नवले, आरती शिंदे, रावसाहेब काळे, विनोद साळवे, निलेश रासकर, रावसाहेब मगर यांनी सांगितले आहे.

सावित्री ज्योती महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर समिती दरवर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येते असल्याचे गणेश बनकर यांनी सांगितले. हा पुरस्कार जाहीर जाहीर झाल्याबद्दल पारनेर तालुक्यासह जिल्ह्यातील पत्रकारांनी, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून वसंत रांधवण यांचे अभिनंदन होत आहे.

# मिशन मोडवर काम करून ठाणे जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करा- पाणीपुरवठा मंत्री

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित कराव्यात, संबंधित अधिकाऱ्यांनी तसेच कंत्राटदारांनी नेमून दिलेली कामे गांभीर्यपूर्वक लवकरात लवकर पूर्ण करावीत, अशा अत्यंत कठोर शब्दात सूचना राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आज येथे दिल्या.

राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी ठाणे जिल्ह्यातील विविध पाणीपुरवठा योजनांच्या कामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली. मंत्री पाटील यांनी पडघा, वाशिंद, आसनगाव, चेरपोली, खर्डी येथे भेट दिली. या दौऱ्यादरम्यान मंत्री महोदयांसमवेत आमदार शांताराम मोरे, ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे, जिल्हा परिषद जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक प्रमोद काळे, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता प्रशांत भामरे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता तन्मय कांबळे आदी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पाटील म्हणाले की, नुकतीच मंत्रालयात ठाणे आणि शहापूर जिल्ह्याची आढावा बैठक घेण्यात आली. पाणीपुरवठा संबंधित काही योजना आहेत, त्या योजनांची पाहणी करणे, अपूर्ण योजना पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक कार्यवाही आणि अंमलबजावणी गतिमान करणे, त्यासोबतच बंद असलेली कामे बंद का आहेत, त्यासंबंधी अडचणी काय आहेत, त्या जाणून घेण्यासाठी या दौऱ्याचे नियोजन करण्यात आले. या दौऱ्यात स्थानिक आमदार तसेच लोकप्रतिनिधीही सोबत असणार आहेत. आपल्या देशाचा हर घर जल...हर घर नल हा एक ड्रीम प्रोजेक्ट आहे. तो पूर्णत्वास येण्याकरिता हा दौरा आहे. त्यानुषंगाने या दौऱ्यात माहिती घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. ठाणे जिल्ह्यातील धरणांबाबत सांगताना पाटील पुढे म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे याकरिता पाठपुरावा करीत आहेत. धरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण होईल, यासाठी आमचे प्रयत्न असणार आहेत. ठाणे जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत १ हजार ४७ कामे सुरु आहेत. त्यापैकी ७२० नळ पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण असून ३२७ कामे, घरगुती नळजोडणीची आहेत. यामध्ये शहापूर तालुक्यातील ७ कामे अद्याप सुरू झाली नाहीत. याबाबत वनविभागाचे वाईल्डलाईफची परवानगीची ४ कामे प्रलंबित आहेत. तर २ कामे जागेच्या अंतर्गत वादामुळे प्रलंबित तर एक ठिकाणी रस्ता नसल्याने तेथे जाण्याची सुविधा नसल्याने प्रलंबित आहेत. त्याचप्रमाणे जल जीवन मिशन अंतर्गत सुरु करण्यात आलेली परंतू सध्या बंद असलेली ५१ कामे आहेत. त्यासंदर्भात कार्यवाही सुरू असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

## परिमंडळ ३ कल्याणमध्ये 'मुद्देमाल हस्तांतरण व CMIS ॲपचे अनावरण' कार्यक्रम संपन्न




**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०८, कल्याण (ठाणे) :** महाराष्ट्र पोलीस दलाच्या स्थापनेच्या निमित्ताने साजऱ्या करण्यात येणाऱ्या पोलीस रेझिंग डे सप्ताहा अंतर्गत परिमंडळ-३ कल्याणमध्ये मुद्देमाल हस्तांतरण व उचखड ॲपचे अनावरण हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम बाजारपेठ पोलीस ठाणे हद्दीत साई नंदन हॉल, कृषी उत्पन्न समिती, वल्लीपीर रोड, कल्याण पश्चिम येथे सायंकाळी ४ ते ७ या वेळेत शांततेत पार पडला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मा. सह पोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण व मा. अपर पोलीस आयुक्त संजय जाधव हे उपस्थित होते. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३ अतुल झेंडे यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट करत सुरुवातीस प्रास्ताविक केले. कल्याण पोलिसांनी तब्बल १.५ कोटींचा चोरीचा मुद्देमाल फिर्यादींना परत केला. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल नागरिकांनी पोलिसांचे मनःपूर्वक आभार मानले. पोलीस व्यवस्थापनाला अधिक कार्यक्षम व नागरिक हितैषी करण्याच्या उद्देशाने CMIS (Crime Management Information System) ॲपचे अनावरण करण्यात आले.प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणाद्वारे नागरिकांनी चोरीसारख्या गुन्ह्यांपासून कशी दक्षता घ्यावी यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला ५०० हून अधिक नागरिकांची उपस्थिती होती. तसेच स्थानिक पत्रकार व प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी कार्यक्रमाला हजर राहून या महत्त्वपूर्ण कामगिरीचे कौतुक करत होते हा कार्यक्रम पोलिसांकडून गुन्ह्यांसंदर्भातील पारदर्शकता व विश्वास निर्माण करण्याचा भाग म्हणून आयोजित करण्यात आला असून भविष्यात नागरिक व पोलिसांच्या सहकार्याने गुन्हेगारी कमी करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे.

# डोंबिवलीतील महात्मा गांधी विद्यामंदिरमध्ये रस्ता सुरक्षा अभियान संपन्न

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०९, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पश्चिम येथील महात्मा गांधी विद्यामंदिरमध्ये पोलीस आयुक्तालय ठाणे शहर आणि डोंबिवली वाहतूक उपविभागांतर्गत ३५वे रस्ता सुरक्षा अभियान यशस्वीरीत्या पार पडले.

या उपक्रमात विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा नियम व सुरक्षित प्रवास याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. सेफ्टी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष विशाल शेटे यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षित प्रवासाचे महत्त्व आणि रस्ता सुरक्षेसाठी अनुसरावयाच्या




नियमांची माहिती दिली. डोंबिवली वाहतूक शाखेचे शशी गांगुर्डे यांनी अपघात का होतात याची कारणे स्पष्ट केली, तसेच अपघातांशी संबंधित आकडेवारी सादर करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.कार्यक्रमादरम्यान, डोंबिवली वाहतूक विभागाचे सहायक पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या अभियानात शाळेचे मुख्याध्यापक श्री.बोरसे यांनी पोलीस विभागाचे आभार मानले. कार्यक्रमाला ट्रॅफिक वॉर्डन सोमासे, ट्रॅफिक वॉर्डन निलेश झेमसे, शाळेतील शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षेच्या नियमांची जाणीव निर्माण झाली असून सुरक्षित प्रवासाची सवय लावण्यासाठी विद्यार्थ्यांसह पालकांना प्रेरणा मिळाली.

# खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचा ३५वा वर्धापन दिन साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** ८ जानेवारी १९८९ रोजी उद्धाटन झालेल्या खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातील संच क्रमांक १ व २ यांना यावर्षी ३५ वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने प्रकाश नगर कॉलनी येथे वर्धापन दिनाचा कार्यक्रम खापरखेडा वीज केंद्राचे प्रभारी मुख्य अभियंता विराज चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रमांतर्गत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात प्रभारी मुख्य अभियंता विराज चौधरी यांनी उत्पादन खर्च कमी करून सुरक्षितपणे व सहकार्याने अधिक वीज निर्मिती करण्याची कटिबद्धता व्यक्त केली. वर्धापन दिनाच्या दिवशी १२०० मेगावॅट पेक्षा अधिक वीज निर्मिती करून केंद्राने एक नवा उच्चांक गाठल्याचे आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले.

या सर्व कार्यक्रमांमुळे अधिकारी कर्मचारी यांच्यामध्ये सहकार्य पूर्ण संबंध स्थापित झालेला आहे आणि त्याचा



फायदा वीज निर्मितीसाठी होईल असे प्रतिपादन वर्धा वर्धापन दिन समितीचे सचिव मोरेश्वर राठोड यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात सांगितले.कार्यक्रमादरम्यान विविध क्रीडा स्पर्धा, महिला फन गेम्स, आनंद मेळावा, म्युझिकल नाईट, सांस्कृतिक कार्यक्रम, नाटक, रक्तदान शिबिर आणि सामाजिक बांधिलकी कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये बॅडमिंटन, क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, बुद्धिबळ, टेबल टेनिस, मॅरेथॉन, कॅरम, रस्ता खेच, रांगोळी व चित्रकला यांसारख्या स्पर्धांचा समावेश होता. आनंद मेळाव्यामध्ये सर्वांनी खूप आनंद घेतला तसेच या सर्व कार्यक्रमांचे प्रमुख आकर्षण म्हणजे हॅपीस्ट्रीट, मामाचे गाव साक्षात साकारण्यात आले होते.

ज्यामध्ये पारंपारिक नृत्य, लहान मुलांसाठी खेळणे, कंचा, भवरे आणि लगोरी व कुंभार काम आणि एक छोटी झोपडी सुद्धा बनविण्यात आली होती. याप्रसंगी महानिर्मितीचे कार्यकारी संचालक पंकज सपाटे, प्रभारी कार्यकारी संचालक विवेक रोकडे, माजी कार्यकारी संचालक प्रकाश खंडारे, मुख्य अभियंता राजेश कुमार ओसवाल, चंद्रपूरचे मुख्य अभियंता विजय राठोड, कोराडीचे मुख्य अभियंता विलास मोटघरे, खापरखेडाचे प्रभारी मुख्य अभियंता विराज चौधरी, माजी मुख्य अभियंता रवींद्र गोहणे, माजी मुख्य अभियंता राजकुमार तासकर, खापरखेडा वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता सुदीप राणे, उपमुख्य अभियंता नारायण राठोड, कोराडीचे उपमुख्य अभियंता कसुरकर, खापरखेडा वीज केंद्राचे कल्याण अधिकारी आनंद वाघमारे आदी मान्यवरांची मंचकावर प्रामुख्याने उपस्थिती होती.

याप्रसंगी कार्यक्रमाला सर्व अधीक्षक अभियंते, सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी, कंत्राटी कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने हजेरी लावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर नागदिवे यांनी केले तर उपस्थितांचे आभार कुलदीप खोब्रागडे यांनी मानले.

## युवा पत्रकार संघाच्या वतीने महाबळेश्वर येथे पत्रकार दिन साजरा




**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०९, महाबळेश्वर (सातारा) :** मराठी भाषेतील आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात जनसामान्यांपर्यंत माहिती पोहोचण्याच्या उद्देशाने 'दर्पण' आवृत्ती मराठी भाषेत काढली ६ जानेवारी रोजी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. त्यांचे स्मरण म्हणून हा दिवस साजरा केला जातो. तसेच हा दिवस पत्रकारांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी व समाजात त्यांनी बजावलेल्या महत्व पुर्ण भुमिकेची कबुली देण्यासाठी समर्पित आहे. द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी अर्चाय बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाबळेश्वर नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील, ॲड .संजय जंगम, अर्बन बँक संचालक सतीश ओंबळे, जेष्ठ पत्रकार संजय दस्तुरे, न.पा.चे मुख्य लिपिक आबा ढोबळे, बाळासाहेब पवार, सचिन गुजर, पत्रकार अभिजीत खुरासणे, संदीप देवकुळे, प्रेषित गांधी, संदेश भिसे,द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष राहुल शेलार, सचिव रियाज मुजावर, राजेश सोंडकर, मिलिंद काळे, अमोद पवार उपस्थित होते. यावेळी दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. तसेच उपस्थित मान्यवरांचे व पत्रकारांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. मुख्याधिकारी योगेश पाटील, जेष्ठ पत्रकार संजय दस्तुरे, ॲड. संजय जंगम, राजेंद्र पवार, द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष राहुल शेलार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचे स्वागत रियाज मुजावर यांनी केले. आभार प्रदर्शन मिलिंद काळे यांनी केले.